संकटांचा सामना आत्म विश्वासाने करा, यश आपलेच आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २७ मार्च २०२५ | अंक १०६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु









# सावधाण दुधात भेसळ करणाऱ्यांना मकोका लावणार

## राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले निर्देश

**दूध आणि तत्सम अन्नपदार्थांत होणारी भेसळ ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे लोकांच्या जीवाला धोका निर्माण होतो. हे खपवून घेतले जाणार नाही. दूध आणि तत्सम अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कडक कारवाई करण्यासाठी सध्याच्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील. त्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. तसेच दुधातील भेसळ तपासण्यासाठी तातडीने प्रत्येक विभागात एक प्रयोगशाळा सुरू करावी, पनीर मध्ये नालॉग चीज असल्यास त्यासंबंधीची माहिती दुकानात दर्शनी भागात लावण्यासंदर्भात सूचना द्याव्यात. दूध भेसळीसंदर्भात जनजागृती करण्यात यावी, भेसळी संदर्भात जनतेला तक्रारी नोंदविण्यासाठी टोल फ्री क्रमांक योग्य प्रकारे कार्यान्वित करावा,पोर्टल विकसित करावे असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.**



## अन्न, औषध विभागाकडे मनुष्यबळ नाही? म्हणून; बीडचे अन्न आणि औषध अधिकारी माणसे मारण्याची वाट पाहणार आणि मग कारवाया करणार का?

दुधातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाला अत्याधुनिक तंत्रज्ञान व यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये आणखी निधी देण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली. अन्न व औषध प्रशासन विभागातील अपुऱ्या मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी डेअरी विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांची सेवा घेण्यात यावी, त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कालच्या बेठकीत दिले. मात्र दादा आपण राज्यात वाढत चाललेल्या दुधाच्या भेसळी बाबत मुद्दा उचलला. हे सोन्याहून पिवळे. मात्र बीडचे अन्न आणि औषध विभाग आणि तेथील अधिकारी कमी मनुष्यबळ असल्याचे कारणे सांगून. कारवाई करण्यात कार्य शून्य ठरलेले आहेत?. अशी जिल्ह्यातील नागरिकांतून ओरड आहे. वर्षभरात न झालेल्या कारवाया.? कारवाया मागील हप्ते खोरी दादा आपणच मोढून काढावी. कारण जिल्ह्यातील वाढलेल्या भेसळीमुळे अनेकांना मोठे आजार लाभले आहेत. यापुढे बीड जिल्ह्यातील नागरिक भेसळीने मृत्युमुखी पडतील तेव्हा बीडचे अन्न आणि औषध अधिकारी कारवाया करतील का? अशी सामान्य नागरिकांतून ओरड पाहावयास मिळत आहे. कारण बीड मधील अन्न आणि औषध अधिकारी कुठे आहे? हेच कळत नसल्याने अन्न आणि औषध अधिकारी कोण? आणि कुठे आहेत?. याबद्दल देखील जिल्ह्यातील जनतेला माहित होत नाही. कारण जिल्ह्यासह बीडमध्ये अन्न आणि औषधी विभागाकडून कारवाई होताना कुठेच दिसून येत नसल्याने.? बीडच्या अन्न आणि औषध विभाग आणि त्याचे अधिकारी जिल्ह्यात आहे का नाही? अशी बीड जिल्ह्यातील नागरिकांतून चर्चा होत आहे. मात्र अजित दादा आपण बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याकारणाने आता बीडच्या अन्न आणि औषध विभागाच्या वर्षभरात झालेल्या कारवाया, आणि अपुरे मनुष्यबळ हे कारण पुढे करणारे अधिकारी यांची एकदा चौकशी करावी अशी नागरिकांतून इच्छा व्यक्त होत आहे. कारण नागरिकांच्या जीवाशी भेसळीच्या माध्यमातून झालेले आज पर्यंतचे

## निलंबन मागे घ्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डॉ.अशोक थोरात यांच्या समर्थनार्थ आंदोलन

बीड । प्रतिनिधी केज मतदार संघाच्या आ.नमिता मु दडा यांनी डॉ. अशोक थोरात यांच्या संदर्भात विधीमंडळात प्रश्न उपस्थित करून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केल्यानंतर आरोग्य मंत्र्यांनी थोरात यांचे निलंबन केले. या निलंबनाच्या कारवाईनंतर जिल्ह्यातील सामाजिक संघटनांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर



आज धरणे आंदोलन केले. चांगल्या अधिकार्याचा बळी राजकारणामुळे जात असून त्यांचे निलंबन रद्द करावी अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. जिल्हा शल्यचिकित्सक म्हणून गेल्या काही महिन्यापुर्वी डॉ.अशोक थोरात यांची नियुक्ती झाली. थोरात आल्यापासून त्यांनी जिल्हा रूग्णालयाला चांगली शिस्त लावली. गोर गरीब रूग्णांवर वेळेवर उपचार होवू लागले. त्यामुळे थोरात यांची सर्व सामान्यात चांगली क्रेझ आह काल विधीमंडळात केजच्या आ.नमिता मुंदडा यांनी थोरात यांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करत त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली. आरोग्य मंत्री थोरात यांचे निलंबन केल्याने जिल्ह्यातील नागरिकांत संताप व्यक्त केला जात आहे. चांगल्या अधिकार्यांचा राजकारण्यांनी बळी घेतला. त्यांचे निलंबन रद्द करण्यात यावे असे म्हणत सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## माजलगांव शहर पोलिसांची आणखी एक दबंग कामगिरी

माजलगांव-प्रतिनिधी माजलगांव शहर येथील आज दिनांक २३/०३/२०२५ रोजी गोपनिय माहीतीच्या आधारे माजलगांव शहर पोलीसांनी माजलगांव शहरातील अरुफात मोहल्ला, मंजरथ रोड, माजलगाव परीसरातील काही लोक तिर्रट नावाच्या जुगार खेळत असल्याची माहीती माजलगांव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांना मिळाले वरुन पोलीसांनी १८.०० वाजता छापा मारुन तेथे तिर्रट नावाच्या जुगार खेळ णारे इसम नामे १) सुनिल बाबुराव गायकवाड २) सलमान नजीर शेख यांना ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन नगदी रुपये, मोबाईल व जुगाराचे साहीत्य असा एकुण २३०४०/-रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला



असुन त्यांचे विरुध्द पोस्ट माजलगाव शहर गु.र.नं.१२१/२०२५ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, नीरज राजगुरु पोलीस उपअधीक्षक उपविभाग गेवराई, अति. पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक संदीप राठोड, पोअ. अमोल कदम, पोअ. शिवगणेश मिरकले, पोअ. सुनिल गवळी, यांनी केली आहे.

## पतीकडून अनैसर्गिक संबंध; तर सासऱ्याकडून शारीरिक अत्याचार

पतीने बळजबरीने अनैसर्गिक संबंध ठेवले, तर सासर्याने जबरदस्तीने शारीरिक अत्याचार केल्याची फिर्याद एका २५ वर्षीय विवाहितेने बारामती शहर पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी शहरातील जळोची भागात राहणारा तिचा पती, सासू व सासरा तसेच दोन नणंदा यांच्या विरोधात विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. पीडितेचा विवाह जानेवारी २०२२ मध्ये झाला. विवाहानंतर सासरच्या लोकांकडून तिला १० तोळे सोन्याच्या दागिन्यांची मागणी करण्यात आली. त्यासाठी तिचा सातत्याने छळ केला गेला. तू पांढर्या पायाची आहेस, काहीही झाले तरी तुला प्रॉपर्टीची मालकीन होऊ देणार नाही. दागिने आण अन्यथा तुला पळवून



लावू आणि माझ्या भावाची मुलगी लग्न करून आणू, असे सासू सातत्याने म्हणू लागली. पतीकडून तिच्यावर अनैसर्गिक संबंध ठेवले गेले. तिने नकार देण्याचा प्रयत्न केला असता तिला मारहाण करण्यात आली. तिच्या दोन्ही नणंदा फोन करून सासूला तिच्या विरोधात सांगू लागल्या. एप्रिल २०२३ मध्ये तिने माहेरी मुलाला जन्म दिला. तत्पूर्वी सासरच्यांकडून गर्भपात करण्यासाठी दबाव टाकला जात होता. १० जानेवारी २०२४ रोजी पती घराबाहेर असताना सासर्याने तिच्या खोलीत येत तिच्या इच्छेविरुद्ध शरीरसंबंध केले. याबाबत कोणाला काही सांगितले तर तुला मारून टाकीन, अशी धमकी दिली. तिने ही गोष्ट सासूला सांगितली असता तिने, ङ्गतू शांत राहा, कोणाला काही सांगू नको,फ असे म्हटले. पतीने तिला दारू पिऊन येत सातत्याने शिवीगाळ, दमदाटी, लाथा-बुक्क्यांनी मारहाण केल्याचे पीडितेने फिर्यादीत नमूद केले आहे

## पत्रकार विठ्ठल लिंगपूजे यांचे निधन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : शिवणी येथील दै.लोकमतचे प्रतिनिधी तथा मराठी पत्रकार परिषदेचे सदस्य पत्रकार विठ्ठल राजप्पा लिंगपुजे वय वर्षे ५५ यांचे ऱ्हदय विकाराच्या झटक्याने दि.२६-मार्च रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास दुःखद निधन झाले असून.त्यांच्या पार्थिवावर रात्री ९ :३० वाजता शिवणी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. विठ्ठल लिंगपूजे त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन,दोन मुली व नात असा परिवार आहे.

## मराठा आरक्षणासाठी रामचंद्र रांजवण या तरुणाची आत्महत्या

बीड पासून जवळच असलेल्या कोल्हारवाडी येथील रहिवासी असलेला तरुण रामचंद्र रामहरी रांजवण या ३५ वर्षे वय असलेल्या तरुणाने आपल्याला आरक्षण मिळत नाही , म्हणून आपल्या मुलांना नोकरी मिळत नाही हा अन्यायच आता मला सहन होत नाही,हे जीवन नकोसे झाले आहे अशी माहिती चिट्टीवर लिहून विष प्राशन केले, तब्बल १० दिवस



त्याने मृत्युशी झुंज दिल्यानंतर अखेर आज त्याची प्राणज्योत मालवली आहे त्याच्या पाठीमागे दोन मुले, एक मुलगी,आई व पत्नी व एक विवाहित भाऊ आहे हे कुटुंब शासनाने उघड्यावर न पडू देता तात्काळ मदत करावी अशी मागणी याच गावातील व शिवसेना बीड तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी शासनाकडे व लोकप्रतिनिधीकडे केली आहे.

# शिवाजी महाराज सर्वधर्मीय नव्हते, हिंदू धर्माच्या रक्षणासाठी होते:संभाजी भिडे यांचा दावा



इतिहासाचा अभ्यास कमी असणारे लोक छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत चुकीची माहिती देत आहे. शिवाजी महाराज या अलौकिक व्यक्तीचा राजकारणासाठी उपयोग करत आहेत. त्यांचा उपयोग राजकारणासाठी करुन घेण्याची हाव असलेले प्राध्यापक, व्याख्याते आणि शिक्षक हे भाडोत्री आहेत. स्वतः शहाजीराजे यांनीही हा देश हिंदुत्ववादी आणि हिंदूंचे राष्ट्र करायचे आहे, असे म्हटले होते. शिवाजी महाराज सर्वधर्मीय नव्हते, शिवाजी महाराज हिंदू धर्माच्या रक्षणासाठी होते. शिवाजी महाराजांवर सर्वधर्म समभाव हे चिकटवले आहे, असे वक्तव्य शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान या संस्थेचे संस्थापक संभाजी भिडे यांनी केले. संभाजीराजे भोसले बोलतात ते 100 टक्के चूक संभाजी भिडे म्हणाले, शिवाजी महाराजांचा उपयोग हे प्रत्येकजण स्वतःच्या स्वार्थासाठी कसा होईल, हे बघतोय त्यामुळे सगळा चौथा झाला आहे. रायगडवरील वाघ्या कुत्र्याच्या स्मारकाला संभाजी भिडे

## संभाजी भिडे गुरुजी ऑन वाघ्या कुत्रा

कुणाल कामरा प्रकरणावरून संभाजी भिडे यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली. कामरा याने नादान प्रकार चालवला आहे. त्यावरून विधानसभेत जो धुडगुस चाललाय ते लोकशाहीला शोभणारे नाही. आर. आर. पाटील यांनी डान्सबार बंदीच्या धाडसी निर्णय घेतला होता. आर. आर. आबांची हिमंत अलौकिक होती. कामरा नावाच्या पद्धतीचे हॉटेल चालवणे म्हणजे डान्सबारची सावत्र असणारी जुळी भावंडे आहे.

गुरुजी यांनी समर्थन देत सांगितले की, संभाजीराजे भोसले बोलतात ते 100 टक्के चूक आहे. वाघ्या कुत्र्या बाबत आपण वाचलेली कथा सत्य आहे. वाघ्या कुत्र्याने चितेत उडी घेतली हे सत्य आहे. त्यामुळे स्मारक करण्यात आले आहे. माणसे एकनिष्ठ नसतात, तेवढी कुत्री असतात. निदान आताच्या युगात देशाशी एकनिष्ठ राहायचे आहे, त्याचे प्रतिक म्हणून वाघ्या कुत्र्याचे स्मारक तिथे राहिले पाहिजे. स्वार्थासाठी कशीही मते बदलणाऱ्या माणसांना माझे मत पटणार नाही. पण त्यांना ही मते पटवण्याचा मी ध्यास घेतलेले नाही, असे भिडे गुरुजी यांनी सांगितले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २७ मार्च २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### प्रदूषणाचा भस्मासुर !

स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर ११ मार्च २०२५ रोजी एक अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे कारण या अहवालानुसार जगातील सर्वाधिक प्रदूषित २० शहरात १३ शहरे भारतातील आहेत. या अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की भारत जगातील पाचव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून आसाम राज्यातील आसाम आणि मेघालयाच्या सीमेवर असणाऱ्या बर्णीहाट हे शहर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले आहे . तर जगातील १३८ देशांच्या राजधानीच्या शहरांपैकी दिल्ली हे सर्वात प्रदूषित राजधानीचे शहर असल्याची नोंद या अहवालात करण्यात आली आहे. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३८ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ८९५४ शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, पंजाबमधील मुलतानपूर, हरियाणामधील लोणी, नवी दिल्ली, गुरुग्राम, गंगानगर, ग्रेटर नोएडा, भिवडी, (राजस्थान -हरियाणा सीमेवरील राजस्थानच्या अल्वर तालुक्यातील शहर) मुझफ्फरनगर, हनुमानगड, नोएडा या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर येते. प्रदूषणामुळे दिल्लीत खेळला जाणारा रणजी सामना रद्द करावा लागला होता. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मु ंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मु ंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मु ंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल

# शंभर दिवस झाले, कुणाला नाही कळले

राज्यात विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या २० नोव्हेंबर २०२४ ला, निकाल लागला २३ नोव्हेंबरला, त्यानंतर तब्बल १३ दिवसांनी ५ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्रात नवीन सरकारचा शपथविधी पार पडला. लागलीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कामाला लागले आणि त्यांनी १०० दिवसांसाठी सात कलमी कृती आराखडा आखला. मात्र प्रशासन गतिमान होण्याऐवजी प्रत्यक्षात वेगळेच घडले आहे. वेगवेगळ्या घटनांनी महाराष्ट्र हादरला आहे. गतिमान शासनाला १०० दिवस झाले, कोणी नाही पाहिले, असेच सध्याचे चित्र आहे. स्वारगेट स्थानकातील एसटीत तरुणीवर अत्याचार, भाजप कार्यकर्ता सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या, सोमनाथ सूर्यवंशी मारहाण आणि मृत्यू, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, लाडक्या बहिणींची फसवणूक, महापुरुषांचा भाजप परिवारातील सदस्यांकडू न अपमान, मंत्रिमंडळातील मंत्र्यांवर भ्रष्टाचारचे आरोप आणि राजीनामा देण्याची ओढवलेली नामुष्की यातच महाराष्ट्र शासन गेल्या शंभर दिवसांत गुरफटून राहिले आहे. ङ्गसोचा था क्या? क्या हो गया!फ असे म्हणण्याची वेळ मुख्यमंत्र्यांवर आली आहे. सरपंच देशमुख हत्या : १० सरपंच देशमुख हत्या : १० सरपंच देशमुख हत्या : १० सरपंच देशमुख हत्या : १० सरपंच देशमुख हत्या : १० डिसेंबर २०२४ : डिसेंबर २०२४ : डिसेंबर २०२४ : डिसेंबर २०२४ : डिसेंबर २०२४ : बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांचं ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करण्यात आलं आणि त्यानंतर त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर केज आणि मस्साजोग या ठिकाणी आंदोलन करण्यात आलं. संतोष देशमुख यांची हत्या, ९ आरोपींना अटक (वाल्मिक कराडसह), मोक्का अंतर्गत कारवाई. बीडमध्ये ११ डिसेंबर २०२४ रोजी बंद. सोमनाथ सूर्यवंशी हत्या १० सोमनाथ सूर्यवंशी हत्या १० सोमनाथ सूर्यवंशी हत्या १० सोमनाथ सूर्यवंशी हत्या १० डिसेंबर २०२४ : डिसेंबर २०२४ : डिसेंबर २०२४ : डिसेंबर २०२४ : डिसेंबर २०२४ : १० डिसेंबर रोजी महाराष्ट्रातील परभणी शहरात संविधानाच्या प्रतिकृतीच्या कथित विट ंबनेनंतर झालेल्या निषेधासंदर्भात अटक झाल्यानंतर न्यायालयीन कोठडीत मृत्युमुखी पडलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांची हत्या झाल्याचा आरोप करण्यात आला. परभणी हिंसाचाराची न्यायालयीन चौकशी करण्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे, अशी माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. त्यात कोणालाही सोडले जाणार नाही आणि दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन देण्यात आले. स्वारगेट बलात्कार : २५ स्वारगेट बलात्कार : २५ स्वारगेट बलात्कार : २५ स्वारगेट बलात्कार : २५ स्वारगेट बलात्कार : २५ फेब्रुवारी २०२५ : फेब्रुवारी २०२५ : फेब्रुवारी २०२५ : फेब्रुवारी २०२५ : फेब्रुवारी २०२५ : स्वारगेट एसटी आगाराच्या आवारात २५ फेब्रुवारी रोजी सकाळी सहाच्या सुमारास परगावी निघालेल्या एका प्रवासी तरुणीकडे आरोपी गाडेने वाहक असल्याची बतावणी करून तिला एका शिवशाही बसमध्ये नेले. दरवाजा लावून घेत त्याने तरुणीला जीवे मारण्याची धमकी देऊन दोनदा बलात्कार केल्यानंतर गाडे गुनाट (ता. शिरूर) गावी फरार झाला होता. पुण्यातील स्वारगेट बस स्थानकावर एका २६ वर्षीय तरुणीवर डेपोमध्येच असलेल्या मशिवशाहीफ बसमध्ये २५ फेब्रुवारीच्या पहाटे ही बलात्काराची घटना घडली होती. अखेर २८ फेब्रुवारी रोजी पहाटे दत्तात्रय गाडे याला पकडण्यात पुणे पोलिसांना यश आले. त्यानंतर न्यायालयाने आरोपीला १२ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. भ्रष्टाचाराचे आरोप असलेले भ्रष्टाचाराचे आरोप असलेले भ्रष्टाचाराचे आरोप असलेले भ्रष्टाचाराचे आरोप असलेले भ्रष्टाचाराचे आरोप असलेले मंत्री : धनंजय मु ंडे -माणिक मंत्री : धनंजय मु ंडे -माणिक मंत्री : धनंजय मु ंडे -माणिक मंत्री : धनंजय मु ंडे -माणिक मंत्री : धनंजय मु ंडे -माणिक कोकाटे : कोकाटे : कोकाटे : कोकाटे : कोकाटे : सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्यावर ते कृषिमंत्री असताना जवळपास २७५ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना धनंजय मु ंडे हे कृषिमंत्री होते. त्यावेळी कृषी साहित्य खरेदी करण्यात आले होते. कृषी साहित्य खरेदीत आर्थिक गैरव्यवहार झाला. बाजारभावापेक्षाही अधिक दराने साहित्य खरेदी करण्यात आले. त्याशिवाय, साहित्य खरेदीच्या निविदा खुल्या करण्याआधीच रकमेचे वाटप संबंधित कंपनीला करण्यात आल्याचा आरोप दमानिया यांनी केला. संतोष देशमुख प्रकरणानंतर धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला. महाराष्ट्राचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनील कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा ठोठावली होती. दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपये, अशी शिक्षा न्यायालयाकडून सुनावण्यात आली. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी कोकाटे आणि त्यांच्या भावाविरोधात गुन्हा दाखल केला होता. १९९५ साली कागदपत्रांमध्ये फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप कोकाटे यांच्यावर असून त्याबाबतचा खटला सुरू होता. नाशिक जिल्हा न्यायालयाने २० फेब्रुवारी २०२५ या प्रकरणात निर्णय सुनावला होता. १९९५ मधील एका प्रकरणात कोकाटेंना ही शिक्षा सुनावण्यात आली. तत्कालीन आमदार, खासदार यांच्या कोट्यातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी देण्यात येणाऱ्या सदनिका मिळवताना कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप कोकाटेंवर होता. माणिकराव कोकाटेंना उच्च न्यायालयाने याबाबत दिलासा दिला आणि त्यांचे मंत्रिपद वाचले. शेतकरी आत्महत्या : शेतकरी आत्महत्या : शेतकरी आत्महत्या : शेतकरी आत्महत्या : शेतकरी आत्महत्या : २०२४ मध्ये एका वर्षात २,७०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. गेल्या १०० दिवसांत अंदाजे ६००-७०० आत्महत्या झाल्या. लाडकी बहीण फसवणूक : लाडकी बहीण फसवणूक : लाडकी बहीण फसवणूक : लाडकी बहीण फसवणूक : लाडकी बहीण फसवणूक : आतापर्यंत या योजनेंतर्गत २.३८ कोटी महिलांना १७५०५.९० कोटी रुपये वितरीत करण्यात आले आहेत. मात्र या योजनेतून विविध निकष लावत सुमारे पाच लाख बहिणींना बाहेर काढण्यात आले. नागपूर दंगल : नागपूर दंगल : नागपूर दंगल : नागपूर दंगल : नागपूर दंगल : १८ फेब्रुवारी २०२५. नागपूर शहर हे शांतताप्रिय शहर आहे. हिंदू-मुस्लिम दोघेही आजपर्यंत शांततेने रहात आहेत. राम नवमीला दोन्ही समाजाचे लोक उत्साहाने सहभागी होतात, तर ताजुद्दीनबाबाच्या उरुसामध्येही हिंदू मुस्लिम एकोप्याने सहभागी होतात. अशा शहरात धार्मिक दंगल होतेच कशी? सरकारला याची काहीच कल्पना नव्हती का? हे सरकारचे अपयश आहे. पोलीस इंटेलिजन्स काय करत होते आणि पोलिसांवरच हल्ले होत असतील तर गृहमंत्रीपदावर फडणवीस राहतात कसे? त्यांनी राजीनामा दिला पाहिजे. मध्य नागपूरमध्ये ही घटना घडली असून याच भागात केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचे घर आहे. या अशा घटना म्हणजे राज्यावर सत्ताधाऱ्यांचा वचक राहिलेला नाही, याचा पुरावा आहे. मुख्यमंत्र्यांच्या मूळ गावी जर दंगल होत असेल तर त्यास मुख्यमंत्री आणि गृहमंत्री स्वतः जबाबदार आहेत. मात्र याबाबत सगळेच शांत आहेत. औरंगजेबाच्या कबरीमागे औरंगजेबाच्या कबरीमागे औरंगजेबाच्या कबरीमागे औरंगजेबाच्या कबरीमागे औरंगजेबाच्या कबरीमागे दडलंय काय? दडलंय काय? दडलंय काय? दडलंय काय? दडलंय काय? राज्यात अचानक औरंग्याची कबर उखडण्याचा मुद्दा महत्त्वाचा बनला. बजरंग दलाने तर त्याबाबत कार सेवा वगैरे करण्याचा इशारा दिला. बजरंग दलाला लागलीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने खडे बोल सुनावून हा मुद्दा आता महत्त्वाचा नाही हे ऐकवले. म्हणून किमान त्याबाबत चर्चा थांबली. पण अचानक हा मुद्दा का पुढे करण्यात आला असावा याबाबत शांतपणे विचार केला तर काही गोष्टी सहज लक्षात येतात. सत्ताधाऱ्यांची एक गोष्ट नेहमी लक्षात

# महाराष्ट्रात खाजगी प्लेसमेंट एजन्सींसाठी नवे नियम; विधेयक दोन्ही सभागृहात संमत

मुंबई, २६ मार्च: महाराष्ट्रातील खाजगी प्लेसमेंट एजन्सींवर नियंत्रण आणण्यासाठी आणि युवकांना फसवणुकीपासून संरक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्र सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक २०२५ हे विधेयक दोन्ही सभागृहांनी संमत केले असून, यामुळे राज्यातील नोकरी शोधणाऱ्या युवकांसाठी अधिक सुरक्षित आणि पारदर्शक प्रणाली तयार होणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांच्या कारकिर्दीत युवकांच्या कौशल्य विकासासाठी, रोजगारासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. विधानपरिषद सदस्यांनी महाराष्ट्र राज्यात रोजगार मेळाव्याची वाढलेली संख्या, त्याचा युवकांना होणार लाभ, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध होत असलेल्या रोजगाराच्या संधी असे सर्व निर्णय दूरदर्शी व मार्गदर्शक ठरणार असल्याचे सांगितले. तसेच महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक २०२५ आणण्याचा निर्णय सुद्धा ऐतिहासिक ठरेल असे विधानपरिषद सदस्यांनी नमूद केले. या विधेयकामुळे बनावट भरती प्रक्रियेतून होणारी बेरोजगारांची फसवणूक थांबवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करून उमेदवारांचे रोजगारात्मक हित जोपासले जाईल. या विधेयकाबाबत बोलताना मंत्री श्री लोढा म्हणाले, “माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीसजी यांनी राज्यात सरकार स्थापन केल्यानंतर प्रत्येक विभागाला १०० दिवसाचा कार्यक्रम तयार करण्यास सांगितले होते. कौशल्य विकास विभागाच्या १०० दिवस कार्यक्रमात सदर विधेयक असावे असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आणि त्यानुसार आम्ही महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक २०२५ सादर करत आहोत. या विधेयकामुळे तरुणांच्या हक्कांचे संरक्षण होईल आणि प्लेसमेंट एजन्सीवर सुद्धा अंकुश राहील. आता प्रत्येक प्लेसमेंट एजन्सी सरकारच्या नोंदणीकृत चौकटीत असेल, त्यामुळे पारदर्शकता येईल आणि युवकांचा विश्वासही वाढेल.” राज्यातील युवकांना देशातील आणि परदेशातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, पादयोजन संस्थांना सहकार्य करून त्यांचा सहभाग वाढवणे, त्यांच्या कामकाजात पारदर्शकता आणणे तसेच संस्थानाच्या गुणवत्तापूर्वक कामांना प्रोत्साहन देणे हे सदर विधेयकाचे उद्दिष्ट आहे.

**विधेयकातील ठळक बाबी**

**१. या आधी गुमास्ता परवान्याच्या आधारे एजन्सी सुरू करता येत होती, मात्र आता तसे करता येणार नाही. सर्व प्लेसमेंट एजन्सीजना शासनाच्या नोंदणी प्राधिकरणाकडे नोंदणी बंधनकारक असून, वैध नोंदणी प्रमाणपत्राशिवाय कार्य करता येणार नाही.**

**२. चुकीची माहिती, खोटी कागदपत्रे, फसवणूक, माहितीचा दुरुपयोग, नोकरी प्रदान करण्यास निष्फळ ठरणे किंवा नकार देणे, शासनाच्या नावाने लोकांना भटकावणे अशा बाबी समोर आल्यास नोंदणी प्रमाणपत्र रद्द केले जाईल किंवा निलंबित केले जाईल.**

**३. नोंदणीशिवाय कामकाज करणाऱ्यासंस्थांवरदंडात्मककारवाई किंवा तुरुंगवासाची शिक्षा देण्याची तरतूद देखील या विधेयकात आहेत.**

**४. सरकारने केवळ नियमनच नाही, तर रोजगार संधी वाढवण्यासाठीही पावले उचलली आहेत. नोंदणीकृत खाजगी प्लेसमेंट एजन्सींसोबत रोजगार मेळावे, करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास कार्यशाळा आणि सेमिनार यासारखे अनेक कार्यक्रम कौशल्य विकास विभागाद्वारे भविष्यात घेण्यात येतील.**

विधेयकामुळे महाराष्ट्रात नोकरी शोधणाऱ्या युवकांना अधिक संरक्षित आणि पारदर्शक प्लेसमेंट सेवा उपलब्ध होणार असून, खाजगी प्लेसमेंट एजन्सीच्या अनियमित कारभारावर नियंत्रण येणार आहे.

# गेवराईतील श्री समर्थ पार्कमध्ये भिषण पाणी टंचाई

## पाईपलाईन टाकून पाणीपुरवठा करा; नगरपरिषदेचे सीईओ यांना दिले निवेदन

गेवराई : प्रतिनिधी

गेवराई शहरातील ताकडगाव रोडवर असलेल्या श्री समर्थ पार्क या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन नसल्याकारणाने उन्हाळ्यात येथील रहिवासी नागरिकांना तिव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. जानेवारी महिण्यांपासून येथील बोअरवेलचे पाणी कमी झाल्याने नागरिकांना भिषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. मागील दोन वर्षापासून मागणी होत असताना देखील याठिकाणी नगरपरिषद कडुन पाण्याची पाईपलाईन अद्यापही टाकण्यात आलेली नाही. परिणामी सध्या येथील रहिवासी नागरिकांना टँकरने विकतचे पाणी घ्यावे लागत आहे. यासंदर्भात बुधवारी नगरपरिषदेचे सीईओ यांची भेट घेऊन तात्काळ पाणी पुरवठा करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. गेवराई शहरातील ताकडगांव रोडवर श्री समर्थ पार्क आहे. दरम्यान या काँलनीत नगरपरिषदकडून पाणी पुरवठा अद्यापपर्यंत करण्यात आलेला नाही. या काँलनीत जानेवारी नंतर पाणी टंचाईच्या झळा जाणवू लागतात. सध्या तर येथील रहिवासी नागरिकांना विकत पाण्यावर आपली तहान भागवावी लागत आहे. दरम्यान श्री समर्थ पार्क कॉलनीतील सर्व नागरिक नळ कनेक्शन भरण्यासाठी तयार आहेत. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने याबाबत लक्ष देऊन याठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकावी जेणेकरुन उन्हाळ्यात येथील नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार नाही, अशी मागणी नगरपरिषद कार्यालयात लेखी निवेदन देऊन पाठपुरावा करण्यात आला होता. मात्र नगरपरिषद स्तरावरुन अद्यापपर्यंत पाणी पुरवठा करण्यात आलेला नाही. त्यामुळे या कॉलनीतील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. तरी याबाबत नागरिकांच्या भिषण पाणी टंचाईबाबत गांभीर्याने घेऊन नगरपरिषद मार्फत तात्काळ पाईपलाईन करुन पाणी पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी परत एकदा बुधवारी नगरपरिषदेचे सीईओ विक्रम मांडूरके यांना निवेदन देऊन करण्यात आली.

### निवेदनाची तात्काळ दखल, संबंधितांना कारवाईसाठी सुचना

श्री समर्थ पार्कमधील नागरिकांनी बुधवारी नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम मांडूरके यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पाणीटंचाई संदर्भात व्यथा मांडल्या, तसेच याठिकाणी नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यात यावा या मागणीचे निवेदन दिले. यावेळी सीईओ विक्रम मांडूरके यांनी लगेच संबंधित पाणी पुरवठा अभियंता निवृत्ती कड यांच्याशी बोलून तात्काळ पुढील कारवाई करण्यासंदर्भात सूचना दिल्या. त्यामुळे निवेदनकर्त्यांनी सीईओ मांडूरके यांचे आभार व्यक्त केले.



# अवनी अर्जुने हिचे घवघवीत यश



माजलगाव-प्रतिनिधी ध्येय एज्युकेशन महाराष्ट्र संचलित ध्येयतरंग ०.३ आय एम विनर राज्यस्तरीय प्रज्ञाशोध स्पर्धा परीक्षा राज्यस्तरीय भव्य बक्षीस वितरण व कर्तव्यदक्ष अधिकारी सन्मान सोहळा रविवार दिनांक २३/०३/ २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत संपन्न झाला. या सोहळ्यात कुमारी अवनी अनिल अजु ंने ही श्रीपतराव भोसले हायस्कूल धाराशिव येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी या परीक्षेत महाराष्ट्र राज्यातून पाचवा क्रमांक मिळवला तिच्या या नेत्र दीपक यशाबद्दल विद्यार्थी रत्न अवनी व तिचे आईवडील श्री अनिल अजु ंने आणि सौ.अश्विनी अर्जुने यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अहिल्या नगर जिल्ह्याचे कामगार सहाय्यक आयुक्त अनिकेत गोरखनाथ थोरात व हडपसर येथील आमदार चेतन तुपे पाटील व तसेच ध्येय एज्युकेशनचे संस्थापक अध्यक्ष शेंडगे सर व संपूर्ण टीम यांच्या हस्ते प्रमाणपत्र, ट्र ॉफी व धनादेश देऊन गुणगौरव करण्यात आला. अवनी अजु ंने ही शिक्षक नेते बीड जिल्ह्यातील माजी केंद्रप्रमुख श्री उत्तमराव जोगदंड व मुख्याध्यापिका अनिता जोगदंड यांची नात आहे. तिचे या यशाबद्दल शाळा, समाज व सर्व नातेवाईकाकडू न कौतुकांचा वर्षाव होत आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २७ मार्च २०२५
https://lokaarambh.com



# गरजू लाभार्थ्यांना त्वरित घरकुल द्या : दत्ता वाकसे

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत वडवणी तालुक्यातील वंचित असलेल्या भोई, धनगर, गोसावी, बंजारा, लोहार अशा विमुक्त जाती भटक्या जमाती गरजू लाभार्थ्यांसाठी शासनाच्या वतीने त्वरित घरकुल मंजूर करण्यात यावी, अशी मागणी शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केली आहे. वडवणी तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागात भोई, धनगर, गोसावी, बंजारा, लोहार अशा विमुक्त जाती भटक्या जमातीची लोकसंख्या असून कित्येक जणांचे कुटुंब कुडा मातीच्या घरात वास्तव करीत आहे. कित्येक कुटु ंब आजही उघड्यावर संसार करीत आहे. कुडा-मातीच्या घराला आग लागून तसेच अतिवृष्टी झालेल्या पावसामुळे घरांची पडझड होऊन कित्येक विस्थापितांचा संसार उघड्यावर आला आहे. प्रसंगी रात्री-बेरात्री सरपटणारे प्राणी घरात घुसून मोठ्या दुर्घटनासुद्धा घडत आहे. या सर्व गंभीर समस्येची दखल घेऊन शासनाच्यावतीने विमुक्त जाती भटक्या जमाती वर्गासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेंतर्गत घरकुल मंजूर करण्यात यावे. या योजनेंतर्गत सन २०२४ मध्ये शासनाने प्रस्ताव मागितले होते.

# सर्व स्तरातील महिलांचा सन्मान हा मराठी पत्रकार परिषदेचा स्तुत्य उपक्रम : प्राजक्तताई धस

दि.२३ रविवार महिला पुरुषांच्या बरोबरीने सर्वच आघाडीवर आपले कर्तत्व सिध्द करीत आहे.समाजाच्या विविध स्तरावर महिला अग्रेसर आहेत.परंतु आजही पुरुषप्रधान संस्कृतीमळे अनेक ठिकाणी विशेषतः राजकिय क्षेत्रात पदाधिकारी महिलांना पूर्ण स्वातंत्र्य दिसून येत नाही.यासाठी महिलांनी सजग राहिले पाहिजे व कर्तव्याबरोबर बालकांना संस्कार करून भावी पिढी व त्याचे भविष्य उज्वल करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे असे महानंदा दूध महासंघाच्या संचालिका सौ. प्रजाक्तताई सुरेश धस यांनी केले तर पाटोदा तालुका मराठी पत्रकार परिषदेचा सर्व स्तरातील महिलांचा सन्मान हा स्तुत्य उपक्रम असल्याचे प्रतिपादन केले.



दि.२३ मार्च रविवार रोजी पाटोदा तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने आयोजित जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कतु र्त्वान महिलांच्या नारी सन्मान सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी ह. भ. प. राधाताई महाराज आईसाहेब प्रसिद्ध विधी तज्ञ तथा समाजसेविका अड. संगीताताई धसे नगराध्यक्ष सौ. दिपाली राजूभैया जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी पुढे बोलताना सौ. प्राक्ताताई धस पुढे म्हणाल्या की कार्यक्रमात काही पत्रकारांचा विरोध होता मलाही सांगण्यात आले परंतु गट तर न मानता चांगल्या स्तुत्य कार्यक्रमाला माझे सततच प्रोत्साहन व पाठिंबा असल्याचे सांगत महिलांची आजही दखल घेतली जात नसल्याचे सांगत पोलिसांबरोबर जिल्ह्यातील पत्रकारांच्या भूमिका विषयी नाराजी व्यक्त करीत त्यांच्या बाबतीत घडलेल्या घटनेचा ऊहापोह केला.

# गायक निवेदक आकाश जाधव विविध पुरस्कारांनी सन्मानित





शहरातील सुप्रसिद्ध गायक तथा निवेदक आकाश जाधव यांना गेल्या काही दिवसात विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामुळे समाजातील सर्व स्तरातून त्यांचे विशेष अभिनंदन होत आहे. यात निर्भीड पत्रकार संघ माजलगाव च्या वतीने मूकनायक कला भूषण पुरस्कार रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी श्रद्धेय आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते सपत्नीक गायिका (संध्या आकाश जाधव) सन्मानित करण्यात आले. रयत सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य बीड च्या वतीने कला क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल कलारत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. चंपावती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या माजी विद्यार्थी एस.एस.सी बॅच २००२-०३ माजी विद्यार्थी स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात उत्कृष्ट सूत्रसंचालन केल्याबद्दल उत्कृष्ट निवेदक सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. अशाप्रकारे गेल्या काही दिवसात सुप्रसिद्ध गायक निवेदक आकाश जाधव यांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने त्यांच्यावर समाजातील सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आह

# स्वत:च्या हक्काच्या घरासाठी बीडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत द्वारकाधीश मित्र मंडळाच्या वतीने मोफत ऑनलाइन फॉर्म भरणा शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, शहरातील व वार्डतील अनेक इच्छुक लाभार्थ्यांनी आपल्या हक्काच्या घरासाठी मोफत अर्ज भरले. या शिबिरात लाभार्थ्यांना अर्ज भरून देण्यात आले, तसेच अर्जाच्या यशस्वी नोंदणीसाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराच्या समारोपप्रसंगी अर्ज भरलेल्या नागरिकांना अधिकृत पावती देण्यात आली.





यावेळी नगरसेवक श्री. जगदीश गुरखुदे, परशुराम गुरखुदे, तसेच या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष मेहनत घेतलेल्या राजू शेख यांचा उपस्थित लाभार्थ्यांनी मनः पूर्वक आभार मानले. तसेच बीड नगरपरिषदेचे कर्मचारी तांबारे साहेब व शुभम सावंत यांनी देखील या उपक्रमात सहकार्य केले. कार्यक्रमाला शेख आयाज, सचीन जगताप सोनु अकंल राजकुमार जैन नजीर भाई अक्षय भालेराव आरेफ शेख, विशाल जोशी जीलानी भाई अकाश जवकर रोहीत कुलकर्णी यश गुरखुदे गोविंद सरदे तसेच व इतर द्वारकाधीश मित्र मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते. शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरासाठी अर्ज करण्याची मोठी संधी मिळाली असून, भविष्यात अशा उपक्रमांचे आयोजन करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ॲड. मोसीन पिंजारी यांची सरकारी वकील पदी निवड; सामाजिक कार्यकर्त्यांकडून सत्कार

अल्पावधीतच आपल्या कार्यकतृ र्त्वाने ठसा उमटविलेले ॲड. मोसीन अहमद एन.ए.पिंजारी यांची नुकतीच लीगल असिस्टंट डिफेन्स कौन्सिल (एल.ए.डी.सी.) मध्ये निवड झाली. या प्रित्यर्थ सामाजिक कार्यकर्त्यांकडून त्यांचा शाल आणि पुष्पहाराने घा-लून सत्कार करण्यात आला. ॲड. मोसीन पिंजारी हे बी.एस.सी.एल.एल.बी.एल.एल.एम. असे उच्च विद्या विभूषित असून ते आतापर्यंत बीड जिल्हा व सत्र न्यायालयात खाजगी वकील म्हणून उत्कृष्ट कार्य करीत होते. या सोबतच विधी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणूनही कार्यरत होते. त्यांची नुकतीच लीगल असिस्टंट डिफेन्स कौन्सिल मध्ये निवड करण्यात आली. आता ते सरकारी वकील म्हणून कार्य करतील. त्यांच्या निवडीमुळे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे, तरुण तडफदार कार्यकर्ते सय्यद इलयास, शेख जिशान, शेख समीर आणि अल्ताफ पिंजारी यांनी त्यांचा शाल व पुष्पहाराने सत्कार करून पुढील कारकिर्दीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

# रसमार्ग येथील आंदोलनात काँग्रेस सक्षमपणे सोबत : राहुल सोनवणे

गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे गेल्या १८ दिवसापासून जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा नदीमध्ये सोडण्यासाठीची योजना मंजूर करण्यासाठी उपोषणास बसलेल्या दिनेश गुळवे, देविदास चव्हाण, पप्पु रडे व त्यांचे सहकारी यांचे उपोषण सोडवण्यासाठी काँग्रे स प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धनजी सपकाळ व खासदार रजनीताई पाटील यांच्या माध्यमातून सरकारकडून योजना मंजुरीसाठी ठोस पावले उचलण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यासाठी संबंधित मंत्र्यांना भेटून सदरील योजना मंजुरीसाठी प्रयत्न करण्यासाठी अश्वस्त करून उपोषणकर्त्यांचे उपोषण सोडवण्यासाठी आज काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल भैया



सोनवणे यांनी उपोषण स्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांना उपोषण सोडण्यासाठी विनंती केली. जायकवाडी चे पाणी सिंदफणा नदी मध्ये सोडावे या प्रमुख मागणीसह सीरसमार्ग येथे शेतकरी तब्बल १८ दिवसांपासून आंदोलनास बसलेले आहेत मात्र याकडे प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी देखील दखल घेतली नाही हे दुर्देव आहे. परंतु मी काँग्रेस पक्षाचा जिल्हाध्यक्ष या नात्याने व पक्षाच्या वतीने या आंदोलनास पाठिंबा देतो व आमचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि खा. रजनीताई पाटील यांच्या माध्यमातून हा प्रश्न निकाली काढू असे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी बोलताना व्यक्त केले

# स्ट्रेट ड्राईव्ह क्रिकेट क्लबचा खेळाडूंची टी-२० स्पर्धेसाठी निवड



स्ट्रेट ड्राईव्ह क्रिकेट क्लबच्या खेळाडू ंनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर गोवा या ठिकाणी पार पडणाऱ्या टी २० क्रिकेट स्पर्धेसाठी स्थान मिळवले आहे. गरवारे स्टेडियम, औरंगाबादया निवडीसाठी झालेल्या चुरशीच्या चाचणीत क्लबच्या खेळाडू ंनी उत्तम प्रदर्शन करत आपले स्थान निश्चित केले. यामध्ये रुद्र घु ंबार्डे, स्वारीत राका, यश झेंडेकर , संस्कार घोलप ,सम्यक निकाळजे , सक्षम प्रधान यांनी उल्लेखनीय खेळ दाखवला. प्रशिक्षक श्री. जितू सर मार्गदर्शनाखाली खेळाडू सध्या नेट प्रॅक्टिस व फिटनेस सुधारण्यासाठी मेहनत घेत आहेत. या यशाबद्दल क्लबचे प्रशिक्षक, व्यवस्थापक व समस्त गेवराईकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे. खेळाडूंना या स्पर्धेसाठी खूप खूप शुभेच्छा!



आज दि.२५/०३/२५रोजी कल्याण येथील आधारवाडी कारागृहाला भेट दिली.कारागृहातील कैद्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी,त्यांचा कारागृहातील वेळ सत्कारणी लागावा,या दृष्टिकोनातून कारागृहाला वाचनीय पुस्तके भेट देण्यासंदर्भात तेथील वरिष्ठ पोलिस निरीक्षक अभिजीत कोळी साहेब यांना संस्थेच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले.अभिजित कोळी साहेबांनी माझे मनमोकळेपणाने स्वागत केले व संस्थेची माहिती जाणून घेतली व समाधान व्यक्त केले.कारागृहाला वाचनीय भेट देण्याचा उपक्रम पुढील आठवड्यात समारंभपूर्वक होणार आहे त्यावेळी कारागृह अधिक्षकांना जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने वाचनीय भेट देण्यात येतील.

# शिवसेना ओबीसी व्हीजे एनटी सेना बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या!

बीड, प्रतिनिधी- वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने व महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशावरून तसेच शिवसेना महासचिव संजयजी मोरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना ओबीसी व्हीजे एनटी



सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब, शिवसेना बीड जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप व ओबीसी व्हीजे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या उपस्थितीत दि. 23 मार्च 2025 रोजी शिवसेना मुख्यालय बाळासाहेब भवन मुंबई येथे शिवसेना ओबीसी व्हीजे एनटी सेना बीड जिल्हा जिल्हाध्यक्ष पदी मनोज (राजाभाऊ) चव्हाण, जिल्हा संघटक पदी दगडू दादा गायकवाड तर जिल्हा कार्याध्यक्षपदी डॉ. केशवदास वैष्णव महाराज यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदीर्घ अनुभव, दांडगा जनसंपर्क व जनतेप्रती सदैव सेवाभाव असणारे महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी तर बीड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांना बीड जिल्ह्यात पक्ष संघटन बांधणीसाठी भरभक्कम साथ देण्याकरिता नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी समर्पकपणे काम करून समाजातील तळागाळातल्या वंचित, पीडित, शोषित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न कराल अशी सदिच्छा देत महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब तथा या कार्यक्रमास उपस्थित सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी नव नियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. □□□□□

# जीएसटी अभय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.26 :- व्याज व दंड माफीसाठी असलेल्या अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कर देयके (निव्वळ कराचे पैसे भरण्याची) शेवटची तारीख 31 मार्च 2025 आहे, तर या अभय योजने अंतर्गत अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख 30 जुन, 2025 आहे. करदत्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी पोर्टलवर अर्ज सादर करण्याचे आवाहन वस्तू व सेवाकर विभागातर्फे करण्यात आले आहे. याबाबत मदतीसाठी संबंधित क्षेत्रीय जीएसटी अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचे आवाहन राज्यकर सहआयुक्त अभिजित राऊत यांनी केले आहे. केंद्र सरकारने केंद्रीय अर्थसंकल्प 2024 मध्ये केंद्रीय वस्तू व सेवा कर कायदा 2017 अभय योजना जाहीर केली आहे. प्रलंबित वस्तू व सेवा कर विवादांचे निराकरण सुलभ करण्यासोबतच 2017-18, 2018-19 आणि 2019-20 या आर्थिक वर्षाशी संबंधित जीएसटी कायद्याच्या कलम 73 अंतर्गत जारी केलेल्या मागण्यांबाबत करदात्यांवर भार कमी करणे हा योजनेचा उद्देश आहे. या योजनेमुळे करदात्यांना योजनेच्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहून केवळ मूळ कर रक्कम भरून त्यांचा थकित करांतील व्याज व दंड यांची माफी होऊन करदेयता चुकवता येणार आहे. या व्यतिरिक्त ज्या प्रकरणांमध्ये सुरूवातीला कलम 74 अंतर्गत 2017-18, 2018-19 आणि 2019-20 या आर्थिक वर्षासाठी नोटीस किंवा आदेश जारी करण्यात आला होता आणि कलम 73 अंतर्गत अपील प्राधिकरण किंवा अपीलीय न्यायाधिकरण किंवा न्यायालयाच्या निर्देशानुसार योग्य आदेश दिला आहे किंवा तो पारित करणे आवश्यक आहे, त्या प्रकरणांमध्ये व्याज आणि दंड माफ करण्याच्या उद्देशाने कलम 128 अ अंतर्गत समाविष्ट आहे. पैसे भरण्याची व अर्ज दाखल करण्याची तारीख एकच असल्याचा करदात्यांमध्ये गैरसमज निर्माण झाला असल्याचे दिसून आले आहे. व्याज व दंड माफीसाठी असलेल्या अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली कर देयके (निव्वळ कराचे पैसे भरण्याची) शेवटची तारीख 31 मार्च, 2025 आहे, तर या अभय योजने अंतर्गत अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख 30 जुन, 2025 आहे. करदत्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पोर्टलवर अर्ज सादर करण्याचे आवाहन वस्तू व सेवाकर विभागातर्फे करण्यात आले आहे.

# महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन

भारतीय संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीकडून गेल्या १५ वर्षापासून जयभिम महोत्सव साजरा केला जातो आहे. त्या अनुषंगाने यंदाही महापुरुष सामान्यज्ञान स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त इयत्ता ८ वी ते १२ वी मराठी, इंग्रजी माध्यम जिल्हास्तरीय ममहापुरुष सामान्य ज्ञानफ स्पर्धा आयोजित केली आहे. त्या स्पर्धे त एकूण १०० गुणांचे ५० प्रश्न असणार आहेत. सदरील स्पर्धा येत्या (दि.३१) मार्च रोजी सकाळी ठीक ११ ते १२ वेळेत प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. तालुक्यातील टॉप १० विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालय, आदर्श नगर, बीड. या ठिकाणी (दि.६) एप्रिल रोजी ११ ते १२ वाजता होणार आहे. त्याच दिवशी बक्षीस वितरण केले जाणार आहे. या महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेत शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे.असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे. दरम्यान विद्यार्थ्यांनी (दि.२९) मार्चपर्यंत नाव नोंदणी करावी, नाव नोंदणी करण्यासाठी स्पर्धा समिती प्रमुख प्रा.अशोक गायकवाड, ९७६६९०३९०, भारत मगर-९३७३६३६८६३,प्राचार्य प्रदिप गाडे ९४२२७४४३००, सुमित जोगदंड ९४२२३३२२९५,प्रा. राम गायकवाड ९४२३२०३१९९, एड. राजेश शिंदे ९७६५५०४७४०, महादेव इनकर ९४२०१७११७७ यांच्या या मोबाईलवर संपर्क साधावा. असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आह

बीड/महाराष्ट्र
महाराष्ट्र विशेष वार्ता

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

गुरुवार २७ मार्च २०२५
https://lokaarambh.com


# खंडणी प्रकरणात वाल्मिक कराडचा सहभाग असल्याचा निकमचा दावा

बीड : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आज बीड न्यायालयात सुनावणी पार पडली. सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी कोर्टात युक्तिवाद केला. संपूर्ण घटनेला वाल्मीक कराड याने गाइड केले, असा युक्तिवाद उज्ज्वल निकम यांनी कोर्टासमोर केला आहे. वाल्मीक कराड यांनी घटनेला गाईड केल्याचे सीडीआरमधून समोर आल्याचेही उज्ज्वल निकम यांनी युक्तिवादादरम्यान म्हटले आहे. आजच्या सुनावणीदरम्यान आरोपींना व्हिसीद्वारे हजर करण्यात आले. दरम्यान, सुनावणी पार पडल्यानंतर ॲड. उज्ज्वल निकम यांनी पत्रकार परिषद घेत सुनावणीबाबत माहिती दिली. संतोष देशमुख हत्या प्रकरणात उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आज या प्रकरणाची सुनावणी पार पडली असून या सुनावणीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात ८ आरोपींना अटक केली असून त्यांच्यावर मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. मात्र, कृष्णा आंधळे हा आरोपी अद्याप पोलिसांना सापडलेला नाही. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचा खून एका मोठ्या कटाचा परिपाक आहे. हा कट कसा शिजला हे तारखेप्रमाणे न्यायालयाला सांगितले. त्याचप्रमाणे प्रत्येक तारखेबाबत आमच्याजवळ पुरावा आहे, असा देखील दावा न्यायालयात केला. विशेषतः वाल्मीक कराडने ज्याप्रमाणे धमकी दिली. त्याप्रमाणे गँग लीडर सुदर्शन घुले तिथे प्रत्यक्ष आला. सुदर्शन घुलेने देखील धमकीचा पुनरुच्चार केला. या सगळ्या गोष्टी सरकार पक्षाकडे व्हिडिओ आणि ऑडिओ रेकॉर्डिंगच्या स्वरुपात आहेत. अशी माहिती सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांनी दिली. हा कट दोन किंवा दोघांपेक्षा अधिक आहेच. परंतु हा कसा वाढत गेला आणि यातील आरोपी कसे दोषी आहेत. यातील फरार आरोपी कृष्णा आंधळेचाही गुन्ह्यात सहभाग कसा आहे. याबाबत आम्ही न्यायालयाला विषद केले. काही महत्त्वाच्या साक्षीदारांची ओळख गोपनीय ठेवावी, अशी न्यायालयाला विनंती केली आहे. आरोपींची संपत्ती संघटीत गुन्हेगारी कायद्याखाली जप्त करावी, अशीही विनंती आज न्यायालयाला केली. त्यानुसार न्यायालयात अर्ज केलेले आहेत, अशी

## पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी

तपास अधिकारी आणि माझे सहकारी ॲड. बाळासाहेब कोल्हे यांनी आरोपींच्या वकिलांना लागणाऱ्या सगळ्या कागदपत्रांची पूर्तता केली. आमच्याकडे असलेल्या उपलब्ध पुराव्यांनुसार ही घटना ८ ऑक्टोबर २०२४ पासून ते ९ डिसेंबर २०२४ संतोष देशमुखांची निघृण हत्या होईपर्यंत या घटनेची मालिका न्यायालयात विषद केली. प्रत्येक घटनेच्या तारखेविषयी आमच्याजवळ पुरावा आहे. यातील संघटीत गुन्हेगारी कशी फोफावली गेली? आणि यातील म्होरक्या सुदर्शन घुले हा मुख्य आरोपी वाल्मीक कराड याच्या म्हणण्यानुसार कसा वागत होता हे देखील न्यायालयात स्पष्ट केले. तर आतापर्यंत हे प्रकरण आरोप निश्चितीसाठी तयार आहे. मात्र कागदपत्रे न मिळाल्याने आरोप निश्चित करण्यात येऊ नये, अशी विनंती आरोपींच्या वकिलांनी केली आहे. दरम्यान, आता हे प्रकरण आरोप निश्चितीसाठी तयार असल्याचे उज्ज्वल निकम म्हणाले. मात्र कागदपत्रे न मिळाल्याने आरोप निश्चित करण्यात येऊ नये, अशी विनंती आरोपींच्या वकिलांनी केली आहे. याप्रकरणी पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी होणार आहे.



# बाळासाहेब दोडतले यांच्या कडून डिजिटल मीडिया परिषदे च्या नूतन कार्यकारिणीचा सत्कार



अंबाजोगाई : महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री व यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बालासाहेब दोलतडे यांच्या वतीने मराठी पत्रकार परिषद संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषद अंबाजोगाईच्या नूतन कार्यकारणी चा अध्यक्ष संग्राम महाराष्ट्राचा न्यूज चैनल संपादक श्री अभिजीत लोमटे, कार्याध्यक्ष अंबाजोगाई दर्शन न्यूज चॅनल चे संपादक सतीश मोरे कोषाध्यक्ष व एन टीव्ही न्यूज चॅनलचे प्रतिनिधी मनोज कोकणे सह कोषाध्यक्ष व जंग न्यूज चॅनल अहमद पठाण यासह नूतन कार्यकारिणीचा फेटा शाल पुष्पगुच्छ सत्कार करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते संजय साळवे युवा उद्योजक लहू सुरवसे युवा उद्योजक अंकुश सुरवसे यांच्यासह अनेक जण उपस्थित होते अलीकडच्या काळात डिजिटल मीडियाला अधिक महत्त्व प्राप्त झाले असून डिजिटल मीडियाच्या माध्यमातून आपल्या शहराचा ग्रामीण भागाचा विकासात्मक बातम्या प्रकाशित करून सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचे काम डिजिटल मीडियाच्या माध्यमातून करावे नुकत्याच झालेल्या डिजिटल मीडियाच्या नूतन कार्यकारणीत आमच्या मित्राचा सहभाग झाल्याने यशवंत सेनेच्या वतीने हा सन्मान आम्ही केला आहे असे मत माजी राज्यमंत्री व यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री बाळासाहेब दोडतले यांनी बोलताना व्यक्त केल

# हिरकणींनी बचतीतून शेती आणली नफ्यात

आडस । येथील महिलांनी एकत्र येत हिरकणी महिला शेतकरी गट स्थापन करुन पाणी फाउंडेशनच्या फार्मर कप स्पर्धेत सहभाग घेतला, यात गटशेती करीत बियाणे खरेदी ते काढणी इर्जिक पद्धतीने मदत त्यामुळे पैशाची बचत म्हणजेच कमी खर्चात जास्त उत्पादन घेतले अन् नुकसानीतील शेती नफ्यात आणली, विशेष म्हणजे या गटाने सेंद्रिय सोयाबीन पीक घेतले आहे. यासह विविध उपक्रम राबविण्यात आले. पाणी फाउंडेशनच्या परिक्षेत हे गट पास होऊन केज तालुकास्तरीय द्वितीय पुरस्काराने रविवारी (दि.२३) या हिरकणी गटाला सन्मानित करण्यात आले. यामुळे हिकणीने बचतीतून शेती नफ्यात आणल्याची प्रतिक्रिया व्यक्त करीत गटाचे अभिनंदन करण्यात येत आहे. २०२२ला फार्मर कप स्पर्धा सुरू झाली आणि २०२३ ला काही महिला या स्पर्धेत सहभागी होण्याच्या उद्देशाने ३ दिवसाच्या प्रशिक्षास गेल्या .प्रशिक्षण घेऊन आल्यावर खुप जिद्दीने आडस येथील १४ महिला हिरकणी महिला शेतकरी गट या नावाने फार्मर कप



स्पर्धेत सहभागी झाल्या, सोयाबीन पीक निवडण्यात आले. स्वतःच्या शेतातील मातीची तपासणी करण्यात आली. ही गट शेती स्पर्धा असल्याने सगळ्याना सहभागी करून समतोल साधत व संगन मताने कामकरुन हा धनुष्य पेलला. घरगुती अडचणी सोडवत महिला गट चालवत होत्या ही लढाई आधी नवर्या कडून एक एक्कर शेती गट शेती घेण्यापासून सुरू झाली. त्यात सुधारीत पद्धतीने नियोजन बद्ध सेंद्रिय उत्पादन घेणे व उत्पन्नात वाढ करणे, बियाणे खरेदी साठी पहील्यांदाच महिला चौकात कृषी दुकानात गेल्या व बाजारपेठेत महिला शेतकरी हा चर्चेचा लक्षवेधक विषय झाला.एकत्र बी बियाणे,खते यांची खरेदी करून पैशाची बचत केली. पहिल्या वर्षी पाऊस कमी झाला. खूप कामे केली पण बक्षीसापर्यंचत पोहोचता आले नाही. परत मागील वर्षी सहभाग घेतला यावेळी स्वतः तयार केलेले दशपर्णी,निबोंळी अर्क,जीवामृत यांच औषधाचा वापर केला त्यामुळे कमी पावसात ही पीक जोमदार आले. चिकट सापळे,कामगंध सापळे,पक्षी थांबे ,सापळा पिके लावून किड नियंत्रण केली.एकमेकींच्या शेतातील खुरपणी ,काढणी या कामात इर्जिक पद्धतीने मदत त्यामुळे पैशाची बचत झाली. कमी खर्चात जास्त उत्पादन घेण्याचा प्रयत्न यशस्वी झाला. या वर्षी एकत्र निविष्ठा खरेदीतून ३३७६८ रूपये बचत झाली. दर्जेदार कामाने घेतले भरघोस उत्पन्न सरासरी एक्करी १६.२ क्विंटल व सोयाबीन इर्जिक पद्धतीने काढणी करून केली ८० हजारांची बचत झाली. ४ हजार ३६० गटातून हिरकणी शेतकरी महिला गट तालुकास्तरिय जजिंगसाठी पोहचला, अंतिम परीक्षा झाली आणि निकाल पाहण्यासाठी आम्ही २३मार्च ला पोहचलोत बालेवाडी स्टेडीयम पुणे येथे जिथें भरला होता संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकर्यांचा स्नेहमिलन मेळावा व प्रोत्साहन वाढवणारा सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा २०२४ चा बक्षिस वितरण कार्यक्रम झाला. हिरकणी गटाला केज तालुक्यातून द्वितीय बक्षीस मिळाले, याचे स्वरुप स्मृती चिन्ह आणि रोख रक्कम २५ हजार असे आहे. याबद्दल या हिरकणी गटावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सायबरचे पोलीस उपनिरीक्षक निलंबित

सायबर विभागात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक रणजित कसले यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी हा निलंबनाचा आदेश जारी केला आहे. काल दोन कर्मचारी अन् आज उपनिरीक्षकाची विकेट गेल्याने बीड पोलीस दलात खळबळ उडाली आहे. पोलीस उपनिरीक्षक रणजित कसले हे सायबर गुन्ह्याच्या तपासासाठी बाहेर राज्यात गेले असताना, त्यांनी संबंधित प्रकरणात आर्थिक तडजोड केल्याचा व्हिडिओ समोर आला. हे प्रकरण स्थानिक पातळीवर न थांबता थेट राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचले. चौकशीत दोषी असल्याची पुष्टी झाल्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी चुकीच्या कृत्यांवर कठोर भूमिका घेत आणखी एका अधिकाऱ्यावर कारवाई केल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. कालच चकलांबा येथील दोन पोलीस कर्मचारी निलंबित करण्यात आले त्यानंतर आज पोलीस उपनिरीक्षक निलंबित झाला. या कठोर आणि धडाकेबाज कारवाईतून पोलीस अधीक्षक यांनी चुकीला माफी नाही असाच संदेश दिल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.


# शुक्रवारी बीडमध्ये जरांगे पाटलांच्या प्रमुख उपस्थितीत महत्त्वाची बैठक

बीड : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जाजवल्या इतिहासातून प्रेरणा घेऊन येणारी पिढी चरित्र्यसंपन्न व सामर्थ्यशाली बनावी या हेतूने नवीन शैक्षणिक धोरणात छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावा या महत्वपूर्ण मागणी सोबतच, मराठा समाजातील विद्यार्थ्यां व कर्मचाऱ्यांचे प्रश्न सरकार समोर मांडून ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी शुक्रवारी (ता. २८) संध्याकाळी सहा वाजता आशीर्वाद मंगल कार्यालय बीड येथे मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्ह्यातील शिक्षक, वकील, डॉक्टर इंजिनिअर सर्व कर्मचारी व समजबंधव संघटनेने भव्य मेळाव्याचे आयोजन केले आहे.यांच्या उपस्थितीत महत्त्वाच्या विषयावर चर्चा होणार असून नेमकं या बैठकीत मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेतात हे पाहणं सुद्धा महत्त्वाचं ठरणार आहे. मराठा समाजाने या मेळाव्यास एक दिवस जातीसाठी या उद्धेशाने समाज बांधवानी मोठ्या प्रमाणात उपस्थितीत राहण्याचे आवाहन समितीच्या वतीने केले आह

# आदित्य दंत महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम, अंतिम वर्षाचा ९६ टक्के निकाल

शैक्षणीक क्षेत्रात बीडसह महाराष्ट्रात अग्रगण्य असलेल्या आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य दंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यंदाही यशाची परंपरा कायम राखत उज्वल यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचा अंतिम वर्षीचा निकाला ९६ टक्के लागला असून यामध्ये जळगावची अनुष्का सोनवणे प्रथम, पुण्याची संयुक्ता पाटील द्वितीय तर गेवराईची सारिका कापसे तृतीय आली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे मुख्य







प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, प्राचार्य रॉबर्ट जस्टीन, उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव यांनी अभिनंदन केले. आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य दंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केल्यानंतर बोलताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव म्हणाले की, संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्रजी सारडा हे विद्यार्थ्यांचे मनोबल वेळोवेळी वाढवत आहे. प्रत्येक विद्यार्थी यशस्वी कसा होईल त्यावर त्यांचे बारकाईने लक्ष असते. त्यामुळे आज महाविद्यालयाचा ९६ टक्के निकाल लागला आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या परिश्रमाचे सोने दाखवले आहे. विद्यार्थ्यांचे यश हेच संस्थेच्या नावाला उजाळा देत असते. विद्यार्थांच्या विजयातच आमच्या प्रयत्नांचा सन्मान असल्याचे उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव सर म्हणाले.

# किनवट शहरातील रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गासाठी नागरिक वैतागले

## खोदून ठेवलेल्या रस्त्यावर दररोज अपघात शहरवासीयांचा तीव्र आंदोलनाचा इशारा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड-किनवट : मागील सहा वर्षापासून किनवट शहरातील चालू असलेल्या 161-A हा राष्ट्रीय महामार्ग नागरिकांसाठी जीवघेणा ठरत आहे.निकृष्ट दर्जाचे काम व खोदून ठेवलेल्या रस्त्यामुळे वाहनधारक व्यापारी वर्ग व शहरातील सर्वच नागरिका त्रस्त असून या महामार्गाला सुरुवात होणार किंवा नाही हे कळायला मार्ग नाही. आठवडाभरात



रस्ता दुरुस्त होत नसेल तर रस्त्यावर नांगर चालवून महामार्ग बंद करू असा खोचक इशाराच सर्व स्तरावरून ऐकावयास मिळत असुन येथील सर्व पत्रकार संघटना व विकास प्रेमी नागरिक या जिवघेन्या रस्त्यासाठी तीव्र आंदोलन छेडून संबंधीत गुत्तेदार व राष्ट्रीय महामार्ग अधिकारी यांना सबक शिकवणार असल्याचेही बोलल्या जात आहे. किनवट शहरातील नागरिकांना जाणून बुजून त्रास देणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग संबंधित गुत्तेदार यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते चुंगी नाक्यापर्यंतचा रस्ता खोदून ठेवला खरा परंतु रस्त्याच्या बाजूने असणाऱ्या नाल्या या कामामुळे भुजल्या आहेत. त्यावर शहरातील जाणाऱ्या नालीचे पाणी रस्त्यावर येऊन अनेक वाहने स्लिप होऊन अपघात होत आहेत. याला जिम्मेदार कोण ? शांततेत असलेल्या किनवटकरांना संबंधित गुत्तेदार व राष्ट्रीय महामार्ग अधिकारी हे जाणीवपूर्वक त्रास देत असून आता किनवटकरांनी जागे होऊन यांना धडा शिकवण्याची वेळ आली आहे. मागील सहा वर्षांपासून 161-A या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असून सर्व ठिकाणचे काम आटोपले तरीही शहरातील कामास संबंधित गुत्तेदारांनी शुभारंभ लावला परंतु संपूर्ण शहरातला रस्ता खोदून ठेवल्यामुळे व त्यावर नदीपात्रातील मुरूम टाकल्याने धुळ व खड्ड्यांपासून वाहनधारक नागरिक व व्यापारी त्रस्त असल्यामुळे संबंधित शासकीय अधिकारी व गुत्तेदारांची वारंवार संवाद साधूनही या कामास पूर्तता होत नसल्याचे चित्र समोर दिसत असल्याने संतप्त नागरिकांमध्ये संबंधिताबद्दल असंतोष निर्माण होत आहे. शहरातील अनेक वर्षापासून ताटकळ असलेल्या राष्ट्रीय महामार्गाबद्दल राष्ट्रीय महामार्ग अभियंता श्री. हटकर यांच्याशी भ्रमध्वनी द्वारे संपर्क साधण्याचा वारंवार प्रयत्न करूनही ते फोन उचलण्यास व नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्यास तयार नाहीत तर यापूर्वी मागील पंधरा दिवसांपूर्वी त्यांनी आठ दिवसांमध्ये कामाची पूर्तता करू असे आश्वासन दिल्यानंतर किनवटकरांना दिलासा मिळाला होता परंतु आज घडीला संबंधित अधिकाऱ्यांशी कुठलाही संपर्क होत नसल्याने हा शहरातील रस्ता बनवणार किंवा नाही यावरुन स्पष्ट होते.याबद्दल नागरिक संतप्त होत असून सर्व पत्रकार संघटना व सर्व व्यापारी संघटना व शहरवासी आंदोलनाच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com